दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ३२ ✻ जालना ✻ ✻ बुधवार ०२ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

# जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्या, स्वच्छतागृह आदींच्या सद्यस्थितीचा अहवाल सात दिवसात द्या : पालकमंत्री पंकजा मुंडे

मुंबई : जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, कंपाऊंड वॉल आदींची सद्यःस्थितीबाबत पाहणी करून येत्या सात तारखेपर्यंत अहवाल देण्याचे निर्देश पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या. तसेच जालना जिल्ह्यातील शैक्षणिक सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आदर्श शाळा, अंगणवाडी, आधुनिक ग्रंथालये आणि क्रीडांगणांच्या विकासाचा सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्यांची दुरुस्ती तसेच नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाबाबत तसेच जालनाई सिल्क ब्रँडिंगबाबत पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी आज मंत्रालयीन दालनातून आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा उपस्थित होते. तर जिल्हापरिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे यांच्यासह इतर अधिकारी हे दृरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. श्रीमती मुंडे यांनी जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, जुन्या वर्गखोल्यांची दुरुस्ती, मुला-मुलींसाठीची शौचालयाची स्थिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदींचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडी आणि ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींची सद्यस्थिती, आवश्यक दुरुस्ती, उपलब्ध निधी आणि प्रलंबित कामे यांचा आढावा घेण्यात यावा. निधी मंजूर असूनही निविदा प्रक्रिया अथवा प्रशासकीय कार्यवाही वेळेत पूर्ण न झाल्याने निधी अखर्चित राहणे स्वीकारले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही श्रीमती मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच पुढील काही दिवसात जिल्ह्यातील अंगणवाडी व ग्रामपंचायत इमारतींचा आढावा घेण्यात येणार असून यासंदर्भातील अहवाल तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. श्रीमती मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यात शाळांच्या डिजिटलायझेशन, आदर्श शाळा उपक्रमासाठी निधी उपलब्ध आहे. या निधीतून अस्तित्वातील अधिकाधिक शाळांचा दर्जा सुधारण्यावर भर द्यावा. रंगरंगोटी, आवश्यक दुरुस्ती, बालस्नेही सजावट, डिजिटल वर्गखोल्या, दर्जेदार बाके, पुस्तके आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

### शाळांमधून समता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश

शाळांच्या भिंतींवरील चित्रे व संदेश हे केवळ सजावटीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये समता, सामाजिक सलोखा, सर्वसमावेशकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारे असावेत. पंचतंत्रातील कथा, संत-महापुरुषांचे विचार, प्रेरणादायी प्रसंग आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या चित्रांचा समावेश करावा. स्थानिक संस्कृती आणि परिसराशी सुसंगत अशी बालस्नेही संकल्पना तयार करण्याच्या सूचना श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या. शाळांमधील उपलब्ध मैदाने वापराविना पडून राहू नयेत. मैदानांवर मऊ लाल माती टाकून खो-खो, कबड्डी, मल्लखांब आणि बॅडमिंटनसारख्या खेळांसाठी किमान आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी उपलब्ध क्रीडांगणांचा नियमित वापर होईल, याचे नियोजन करावे. तसेच शाळांमध्ये तंबाखू अथवा मद्याचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईसाठी जिल्हा परिषदेने पथक तयार करून वेळोवेळी पाहणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.



श्रीमती मुंडे म्हणाल्या की, आदर्श शाळेत विद्यार्थ्यांसाठी वाचनालय, किचन गार्डन, सुरक्षित हरित कुंपण, वृक्षारोपण, सीसीटीव्ही यंत्रणा आणि अखंडित वीजपुरवठा असावा. डिजिटल वर्गखोल्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन आणि परस्परसंवादी शिक्षण घेता आले पाहिजे. अंगणवाडी आणि जिल्हा परिषदेच्या शाळांना व्यावसायिक दराने वीजबिल आकारल्यास त्यांच्या मर्यादित अनुदानातून हा खर्च भागविणे कठीण होते. त्यामुळे अंगणवाडी आणि शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्र अथवा सवलतीचा वीजदर लागू करण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### नगरपालिका शाळांच्या सुधारणेचा आराखडा तयार करा

जालना नगरपालिकेच्या १६ शाळा सध्या असून विद्यार्थी संख्येवर आधारित शाळांची संख्या निश्चित करावी. विद्यार्थीसंख्या, इमारतींची सद्यस्थिती, झोपडपट्टी व वंचित वस्त्यांची ठिकाणे आणि विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ या बाबींचा अभ्यास करून शाळांमध्ये सुधारणा करण्यासाठी आराखडा तयार करावा, अशा सूचनाही श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या.

### ग्रंथालयांमध्ये डिजिटल आणि संशोधन सुविधा

जालना महानगरपालिकेच्या हद्दीत विकसित करण्यात येणारी ग्रंथालये पारंपरिक स्वरूपाची न ठेवता स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, संशोधक आणि नियमित वाचक यांच्या गरजांनुसार विकसित करावीत. स्वतंत्र अभ्यास कक्ष, मुक्त वाचन क्षेत्र, संगणक व लॅपटॉप सुविधा, दूरदर्शन संच, ऑनलाइन मार्गदर्शन आणि संशोधन विभागाचा त्यात समावेश असावा, असे त्यांनी सांगितले. महापालिकेच्या वतीने सुधारणा करण्यात येणाऱ्या उद्यानांची प्रलंबित निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. उद्यानांमध्ये वृक्षारोपण, धूळ व प्रदूषण कमी करणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकांसाठी आरोग्यदायी सुविधा निर्माण करण्यात यावे. सर्व प्रकल्पांचे डिझाईन, खर्च, निविदा प्रक्रिया आणि अंमलबजावणीचे वेळापत्रक निश्चित करून कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

### जालना रेशीम उत्पादनांसाठी वैशिष्ट्यपूर्ण डिझाईन

जालनाई सिल्कच्या ब्रँडिंगसंदर्भात सादरीकरण करण्याचे निर्देश देऊन श्रीमती मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील जालनाई सिल्कच्या उत्पादनांना स्वतंत्र बाजारपेठीय ओळख मिळवून देण्यासाठी तीन ते पाच वैशिष्ट्यपूर्ण डिझाईन निश्चित करावीत. मोसंबी, स्थानिक दगडी जाळी व स्थापत्यशैली तसेच अजिंठा कलाशैलीपासून प्रेरित घटकांचा डिझाईनमध्ये वापर करण्याची शक्यता तपासावी. डिझाईनची संख्या मर्यादित ठेवून ती जालना जिल्ह्याची सहज ओळख बनतील, याकडे लक्ष द्यावे. यासाठी व्यावसायिक ब्रँडिंग सल्लागाराची मदत घेऊन उत्पादनांची गुणवत्ता, कच्चा माल, विणकामासाठी लागणारा कालावधी, कारागिरांची मजुरी, किंमत आणि विक्री व्यवस्था यांचा समावेश असलेला सविस्तर व्यवसाय आराखडा तयार करावा. सुरुवातीच्या टप्प्यात मध्यमवर्गीय ग्राहकांना परवडणारी दर्जेदार उत्पादने बाजारात आणून ब्रँडवरील विश्वास निर्माण करावा. त्यानंतर उच्च मूल्याच्या उत्पादनांची स्वतंत्र श्रेणी विकसित करावी. उत्पादनांच्या किंमती ठरविताना विणकर आणि कारागिरांना योग्य मोबदला मिळेल, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

## जालना जलकवच अभियान २०२६ अंतर्गत जलतारा कामांचे भूमिपूजन उत्साहात

बदनापूर : जालना जलकवच अभियान २०२६ अंतर्गत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये VB-G R-M-G योजनेच्या माध्यमातून जलसंधारण व पाण्याच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी हाती घेण्यात आलेल्या 'जलतारा' कामांचे भूमिपूजन आज मा. आ.श्री. नारायणराव कुचे साहेब ( विधान सभा सदस्य अंबड बदनापूर मतदारसंघ) यांचे हस्ते उत्साहात पार पडले.

मा.आशिमा मित्तल ( जिल्हाधिकारी जालना)यांच्या संकल्पनेतून तसेच मा.कृष्णकांत कनवारिया (मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद जालना) यांच्या मार्गदर्शनातून



या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. आज म्हसला , मेव्हणा, खामगाव आणि भाकरवाडी येथील गायरान क्षेत्रावर जलतारा कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मा. आ.श्री. नारायणराव कुचे साहेब ( विधान सभा सदस्य अंबड बदनापूर मतदारसंघ)यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा पार पडला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गायरान व उपलब्ध शासकीय क्षेत्रामध्ये जलसंधारणाची कामे करून पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, भूजलपातळी वाढवणे तसेच भविष्यातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना करणे हा आहे. या माध्यमातून गावांच्या जलसुरक्षेला बळकटी मिळण्यासोबतच शेतकरी व ग्रामस्थांना दीर्घकालीन लाभ मिळणार आहे. कार्यक्रमास ज्योती राठोड( गटविकास अधिकारी, (पान ३ वर)

## तळणीच्या ऐतिहासिक जमनागीर बाबा मंदिरात सुविधांचा अभाव



तळणी (प्रतिनिधी) : भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तळणी येथील श्री जमनागीर बाबा संस्थानच्या विकासाकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याचा सूर उमटत आहे. ग्रामस्थांनी एकत्र येत लोकवर्गणीतून मंदिराचा जिर्णोद्धार केला खरा, मात्र वाढत्या भाविकांच्या संख्येमुळे आता येथील जागा अपुरी पडत आहे. श्रावण महिन्यासह वर्षभर या ठिकाणी पंचक्रोशीतील भाविकांची मोठी मांदियाळी असते. मात्र, पुरेशा सोयी-सुविधांअभावी वृद्ध, महिला आणि तरुणांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने, येथे भव्य सभामंडप मंजूर करावा अशी मागणी तळणीकरांनी केली आहे.

पुरातन मंदिराची भिंत कोसळली; दुर्घटनेची भीती

श्री जमनागीर बाबांचे हे मंदिर अत्यंत पुरातन काळातील आहे. देखभालीअभावी मंदिराच्या एका बाजूची संपूर्ण भिंत कोसळली आहे. भिंत पडल्यामुळे मंदिराचा गाभारा आणि परिसर (पान ३ वर)

## मोटारसायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद; दोन दुचाकी जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; ३० हजारांचा मुद्देमाल हस्तगत, अंबड व परतूरमधील दोन गुन्हे उघडकीस

जालना / प्रतिनिधी : जालना जिल्ह्यातील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा शोध घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका संशयिताला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त केल्या. या कारवाईमुळे अंबड आणि परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोटारसायकल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले असून, ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यातील मोटारसायकल चोरीच्या घटनांचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक



पंकज जाधव यांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी मोटारसायकल चोरट्यांची माहिती संकलित करून शोधमोहीम सुरू केली. दरम्यान, १ सप्टेंबर रोजी तपास पथकाला लक्ष्मण पिंटू पवार (वय २१, रा. कुंभारपिंपळगाव तांडा, ता. घनसावंगी, जि. जालना) याच्याकडे चोरीच्या मोटारसायकली असल्याची गोपनीय माहिती मिळाली. ही माहिती (पान ३ वर)

## मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ नागतास प्रकल्पात जलसमाधी आंदोलन

खडकीसह परिसरातील मराठा समाजाचा सहभाग; मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

परतूर / प्रतिनिधी : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या शासनाने तातडीने मान्य कराव्यात, या मागणीसाठी परतूर तालुक्यातील खडकी व आजूबाजूच्या गावांतील मराठा समाज बांधवांनी नागतास प्रकल्पाच्या तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले



होते. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी खडकीसह परिसरातील नागरिक व मराठा समाज बांधव नागतास प्रकल्प परिसरात एकत्र आले. यावेळी आंदोलकांनी तलावाच्या पाण्यात उतरून सरकारविरोधात घोषणाबाजी केली. मनोज जरांगे पाटील यांनी मांडलेल्या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनाची माहिती मिळताच प्रशासनाने त्याची गंभीर दखल घेतली. परतूरचे उपविभागीय अधिकारी नागतास येथे दाखल झाले. त्यांनी आंदोलकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. यावेळी आंदोलकांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. आंदोलकांच्या भावना आणि निवेदनातील मागण्या तातडीने शासनापर्यंत पोहोचविण्यात येतील, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. या आश्वासनानंतर आंदोलकांनी जलसमाधी आंदोलन मागे घेतले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत शासनाने विलंब न करता निर्णय घ्यावा, अन्यथा आगामी काळात आणखी तीव्र आंदोलन करण्याची भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली.

## आंतरवाली सराटी येथे रात्री च्या पावणे अकरा वाजता जालना जिल्हाच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व पोलीस अधिक्षक तेजबीर सिंग सिंधु उपोषण स्थळी

नवनाथ गव्हाणे : आंतरवाली सराटी येथे रात्री १०:४० वाजेला असता जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व जालन्याचे पोलीस अधिक्षक तेजबिर सिंग सिंधू यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषण स्थळी जाऊन सर्व जमलेल्या मराठा समाजाला विनंती केली की मनोज दादा ची तब्बेत खालावली आहे आज चा उपोषणाचा ४ था दिवस आहे तुम्ही सर्वांनी मनोज दादा ला सांगा की उपोषण सोडा कारण बऱ्याच मागण्या ह्या



सरकार ने मान्य केल्या आहे मराठा आरक्षणासाठी ३०० हुन जास्त मराठा बाधवांनी आरक्षण मिळावे म्हणून बलिदान दिले आहे तर सरकार ने त्या बांधवाच्या कुटुंबाला प्रत्येकी १० लक्ष रूपये दिले तुम्ही मनोज दादा ला उपोषण सोडायच सांगा उद्या पासूनच कुणबी नोदी ची यादी पत्येक गावात लावायला सांगु फक्त मनोज दादा ला उपोषण सोडायला लावा असे त्या म्हणाल्या आंतरवालली सराटी येथे रात्री सुद्धा खुप मोठ्या संख्येने मराठा समाज आंतरवाली सराटी येथे आहे मनोज जरांगे पाटील मात्र उपोषणावर ठाम आहे.

# संपादकीय

## मित्रपक्षाकडून मदत

चीन आपल्या ‘कोस्ट गार्ड’ला तैवानच्या हद्दीत पाठवतो, तेव्हा जगाला दाखवतो, की आम्ही कोणतेही युद्ध करत नसून आमच्याच एका प्रांतात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गस्त घालत आहोत. चीनची ही चलाखी आंतरराष्ट्रीय समुदाय आणि विशेषतः अमेरिकेला कोंडीत पकडणारी ठरते. संयुक्त राष्ट्रांच्या नियमांनुसार, कोणताही देश आपल्या संरक्षणासाठी किंवा मित्रदेशाच्या मदतीसाठी थेट लष्करी हस्तक्षेप तेव्हाच करू शकतो, जेव्हा त्याच्यावर ‘सशस्त्र लष्करी हल्ला’ झाला असेल. आता चीनने युद्धनौका न पाठवता केवळ ‘कोस्ट गार्ड’ पाठवले असल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा लष्करी हल्ला ठरत नाही. परिणामी, अमेरिकेसारख्या महाशक्तीलाही तैवानच्या मदतीसाठी थेट आपली नौदल जहाजे पाठवणे कायदेशीर आणि कूटनीतिकदृष्ट्या अवघड होऊन बसते. चीन नेमक्या याच कायदेशीर पळवाटेचा गैरफायदा घेत आहे. या ‘ग्रे-झोन’ रणनीती अंतर्गत चीन एकाच वेळी अनेक पातळ्यांवर तैवानवर दबाव आणत आहे. ज्याप्रमाणे सॅलडच्या रूपात बारीक बारीक तुकडे केले जातात, त्याचप्रमाणे चीन तैवानच्या सागरी हद्दीचे आणि संप्रभुतेचे हळूहळू लहान लहान तुकड्यांमध्ये हरण करत आहे. चीन एकदम मोठा हल्ला करत नाही, कारण त्याला माहीत आहे, की मोठ्या हल्ल्याला तीव्र जागतिक विरोध होईल. त्याऐवजी तो दर महिन्याला आपली जहाजे काही किलोमीटर आत पाठवतो, तिथे काही काळ मुक्काम ठोकतो आणि नवीन सीमा रेषा तयार करतो. काही काळाने घुसखोरी करून ताब्यात घेतलेली तीच जागा अधिकृत मानली जाऊ लागते. या पद्धतीमुळे तैवानला दरवेळी नेमकी काय प्रतिक्रिया द्यावी, हे समजत नाही. चीन तैवानविरुद्ध केवळ ’कोस्ट गार्ड’च नव्हे, तर प्रशिक्षित निमलष्करी जवान असलेल्या व्यावसायिक मासेमारी नौकांचाही वापर करतो. या नौका तैवानच्या बेटांभोवती वेढा घालून दबाव निर्माण करतात. तैवानने कारवाई केल्यास चीन त्याला निष्पाप मच्छीमारांवरील अन्याय म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडतो. थेट लष्करी हल्ल्याऐवजी जहाजांना धडक देणे, पाण्याच्या प्रबळ फवाऱ्यांचा वापर करणे आणि शक्तिशाली लेझरद्वारे दळणवळणात अडथळे निर्माण करणे अशा ’ग्रे-झोन वॉरफेयर’च्या तंत्रांचा चीन अवलंब करतो. यामुळे तैवानचे नुकसान होते, पण मोठी आंतरराष्ट्रीय लष्करी प्रतिक्रिया टाळली जाते. या वाढत्या दबावाला उत्तर म्हणून तैवानने कठोर भूमिका घेतली आहे. चिनी ’कोस्ट गार्ड’कडून तपासणीची मागणी झाल्यास ती नाकारण्याचे आदेश देण्यात आले असून, बळजबरी झाल्यास नौदलाला आवश्यक कारवाईचे निर्देश आहेत. मात्र सततच्या चिनी गस्तीमुळे तैवानच्या सैन्यावर २४ तास सतर्क राहण्याचा ताण असून, मानसिक थकवा आणि आर्थिक भार वाढत आहे. आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील भू-राजकीय नकाशावर तैवानची स्थिती नेहमीच एका धुमसत्या ज्वालामुखीसारखी राहिली आहे. चीनने तैवानला आपल्या मुख्य भूमीचा भाग मानणे आणि तैवानने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपडणे, हा संघर्ष नवा नाही; मात्र अलीकडच्या काळात या संघर्षाचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. पारंपरिक युद्धाच्या तोफा डागण्याऐवजी किंवा क्षेपणास्त्रांची थेट धमकी देण्याऐवजी चीनने आता एका अत्यंत छुप्या, चाणाक्ष आणि दीर्घकालीन रणनीतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. या रणनीतीचे ताजे आणि अत्यंत चिंताजनक उदाहरण म्हणजे चीनने तैवानच्या पूर्व किनारपट्टीवर अचानक वाढवलेली सागरी सुरक्षा दलाची गस्त. एकाच महिन्यात दुसऱ्यांदा चीनच्या कोस्ट गार्डने तैवानच्या अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या पूर्व किनारपट्टीवर कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या नावाखाली शक्तिप्रदर्शन केले. वरकरणी ही केवळ नियमित सागरी गस्त वाटू शकते; परंतु जागतिक संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, हा चीनच्या ‘ग्रे-झोन वॉरफेयर’चा (धुसर क्षेत्रातील युद्धनीती) एक अत्यंत धोकादायक टप्पा आहे. यात सर्वात मोठा प्रश्न हा निर्माण होतो, की जगातील दुसऱ्या क्रमांकाचे शक्तिशाली नौदल पाठीशी असताना चीनने तैवानला घेरण्यासाठी आपल्या ‘कोस्ट गार्ड’ला समोर का केले आहे? यामागे ड्रॅगनची नेमकी कोणती नवी चाल आहे आणि यामुळे आशियातील सुरक्षेचे समीकरण कसे बदलणार आहे, याचा सखोल वेध घेणे गरजेचे आहे. चीन आणि तैवानमधील संघर्षाचा अभ्यास करताना भौगोलिक रचनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. तैवानच्या पश्चिमेला ‘तैवान स्ट्रेट’ आहे, ऐतिहासिकदृष्ट्या, चीनकडून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य हल्ल्याचा किंवा घुसखोरीचा धोका हा याच पश्चिम किनारपट्टीला राहिला आहे. त्यामुळे या पूर्व किनाऱ्यावर आत्तापासूनच आपले वर्चस्व प्रस्थापित करून, संकटसमयी आंतरराष्ट्रीय मदतीचा मार्ग पूर्णपणे रोखून धरण्याची चीनची ही दीर्घकालीन योजना आहे. चीनने नौदलाच्या विनाशकारी युद्धनौका पाठवण्याऐवजी पांढऱ्या रंगाची, नागरी प्रशासनाशी साधर्म्य सांगणारी ‘कोस्ट गार्ड’ची जहाजे का पाठवली, याचे उत्तर ‘ग्रे-झोन वॉरफेयर’ या संकल्पनेत दडले आहे. लष्करी मुत्सद्देगिरीमध्ये ही अशी स्थिती असते, जी पूर्णपणे शांतताही नसते आणि उघड युद्धही नसते. पांढरा रंग म्हणजे शांतता आणि काळा रंग म्हणजे उघड युद्ध असे मानल्यास, या दोन्हीच्या मधला जो धुसर भाग असतो, त्याला ‘ग्रे-झोन’ म्हटले जाते. थोडक्यात सांगायचे, तर शत्रूवर एकही गोळी न झाडता, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे थेट उल्लंघन न करता, समोरच्या देशाला मानसिक आणि रणनीतिकदृष्ट्या इतके थकवून सोडायचे की त्याने शेवटी स्वतःहून गुडघे टेकावेत. हीच ही रणनीती आहे. कोस्ट गार्ड हे अधिकृतपणे लष्कर किंवा नौदलाचा भाग मानले जात नाही, तर सागरी हद्दीतील तस्करी रोखणारे आणि कायद्याचे पालन करून घेणारे नागरी किंवा निमलष्करी बल असते साहजिकच, तैवानने आपली बहुतांश लष्करी सज्जता, क्षेपणास्त्र यंत्रणा आणि संरक्षण तटबंदी याच भागात केंद्रित केली आहे. याउलट तैवानची पूर्व किनारपट्टी थेट प्रशांत महासागराकडे उघडते. भौगोलिकदृष्ट्या हा भाग उंच कडे-कपाऱ्यांनी आणि डोंगराळ भूभागाने वेढलेला आहे. त्यामुळे चिनी नौदलाला थेट पूर्व किनाऱ्यावरून तैवानमध्ये प्रवेश करणे नेहमीच कठीण जाणार आहे. आजवर तैवानी लष्करासाठी हा पूर्व किनारा एका सुरक्षित पनाहगाहासारखा राहिला आहे. युद्धजन्य परिस्थितीत तैवानचे नौदलाचे तळ, लढाऊ विमाने आणि लष्करी रसद सुरक्षित ठेवण्यासाठी याच पूर्व किनारपट्टीचा वापर केला जातो; परंतु चीनने आता नेमक्या याच ‘सुरक्षित क्षेत्रा’कडे आपली नजर वळवली आहे. पूर्व किनारपट्टीवर ‘कोस्ट गार्ड’ची गस्त वाढवून चीनने तैवानला एक स्पष्ट संदेश दिला आहे, की आता त्याच्यासाठी कोणताही कोपरा सुरक्षित राहिलेला नाही. चीन तैवानला केवळ पश्चिमेकडूनच नव्हे, तर पूर्वेकडूनही वेढून पूर्ण नाकेबंदी करण्याचा सराव करत आहे. भविष्यात चीनने तैवानवर थेट लष्करी कारवाई केली, तर पूर्व किनारपट्टीवरूनच अमेरिका, जपान किंवा अन्य पाश्चात्त्य मित्रदेशांकडून तैवानला मदत मिळण्याची सर्वाधिक शक्यता आहे..

# जगातली चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था आणि वस्तुस्थिती याची तुलना




एके दिवशी मी समुद्रावर फिरायला गेलो होतो. संध्याकाळचे सहा वाजले होते. सूर्य अस्ताला जाण्याच्या तयारीत होता. चौपाटीवर बऱ्यापैकी गर्दी होती. तरुण मंडळी पाण्यात खेळत होती. मुलं वाळूत किल्ले बनवत होती. वयस्कर लोक वाळूत बसून समुद्राच्या अथांग रूपाकडे बघत गप्पा मारत बसले होते. मीदेखील एक मोकळी जागा बघून वाळूत बसकन मारली आणि समुद्राच्या लाटांचा खेळ बघत बसलो. हळूहळू सूर्य समुद्रात बुडू लागला. सारी पश्चिम दिशा लाल रंगाने न्हाऊन निघाली. निसर्गाचं एक सुंदर नयनरम्य रूप सारेच लोक मोठ्या कुतूहलाने बघत होते. बराच वेळ मी मनातल्या मनात माझ्याशी बोलत होतो. दुरून कोणालाही वाटावं की मी ध्यानाला बसलो आहे.तेवढ्यात माझ्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला. मी मागे वळून पाहिलं. तर एक लहान मुलगी अगदी रडवलेल्या सुरात मला म्हणाली, काका मला खूप भूक लागली आहे हो, काहीतरी खायला द्याल का? मी कालपासून काहीच खाल्लेलं नाही. मला तिची दया आली. माझ्या मनात विचार आला, कोण असतील हिचे आई-बाबा! या मुलीला एकटे सोडून कुठे गेले असतील. काही काळजी आहे की नाही त्यांना! असे नाना विचार मनात येत होते. पण पुन्हा काका अशी निरागस हाक कानी पडताच मी भानावर आलो आणि तिथून उठलो. मुलीचा हात धरून तिला एका चांगल्या हॉटेलमध्ये नेलं. तिच्यासाठी जेवण मागवलं, तर समोरची भरलेली थाळी ती बघतच बसली. मी म्हटलं, बाळ कर सुरुवात. मग ती दोन दिवस उपाशी असलेली मुलगी पटापट खाऊ लागली. आपण एका भुकेलेल्या मुलीला जेवण देऊ शकलो याचं समाधान मला मिळत होतं. पण दोन-तीन घासातच तिच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. मी म्हणालो, बाळ काय झालं? जेवण नाही आवडलं का तुला? तू अशी रडतेस तरी का! मी म्हणालो. तशी ती खाता खाता म्हणाली, काका अजून एक थाळी मला बांधून द्याल का? माझी आई आजारी आहे. दोन दिवसांपासून तिनेसुद्धा काहीच खाल्ले नाही. आता मात्र मला आश्चर्यच वाटलं. एवढ्या लहान वयात ती मुलगी आपल्या आजारी आईची किती काळजी करते आहे. मी म्हणालो, पोरी तू सावकाश जेव. मी एक नाही जेवणाच्या अजून दोन थाळ्या तुला बांधून देतो. आता मुलीचा चेहरा थोडासा फुलल्यासारखा वाटला. मग मुलीने पटापट जेवण आटोपले. हॉटेलमधून निघताना अजून दोन माणसांचं जेवण बांधून घेतलं. पैसे भरून मी त्या मुलीच्या सोबत घराकडे निघालो. आता मात्र त्या छोट्या मुलीने माझा हात धरला होता आणि ती ओढतच मला तिच्या घराकडे नेऊ लागली. एका झोपडपट्टीत तिचं पत्र्याचं घर होतं. घरात एक छोटासा पिवळा बल्ब जळत होता. आई खाटेवर पडली होती. शेजारी मुलीचा मोठा भाऊ साधारण दहा-बारा वर्षांचा आईची काळजी घेत बसला होता. तेवढ्यात मुलगी म्हणाली, दादा, आई... बघ ना, आपले काका आले आहेत. आई तुझ्यासाठी त्यांनी जेवणदेखील आणले आहे. आपले काका आले आहेत या निरागस वाक्याने माझ्या अंगावर सरर्कन काटा आला. मग त्यांची विचारपूस करून मी त्यांना जेवण दिले. निघताना मी त्या मुलीला म्हणालो, काय गं तू एकच जेवण घ्या असं मला का सांगितलंस. भावासाठी का नाही मागितलं! ती मुलगी म्हणाली, नाही काका... फक्त आई आजारी आहे ना, म्हणून एक थाळी सांगितलं. दादा नाही जेवला तरी हरकत नाही. तशी दोन तीन दिवस उपाशी राहण्याची सवय आहे त्याला. मुलीचा एक एक शब्द माझ्या मनावर खोलवर जखम करीत होता. माझे डोळे भरून आले. मग त्या मुलीकडे न बघताच मी तेथून बाहेर पडलो. एकविसाव्या शतकातला विकसित भारत, जगातली चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था आणि वस्तुस्थिती याची तुलना करत मी सुन्न मनाने घराकडे परतलो.

## ड्रग्जमुक्त करण्यासाठी २०२९ची डेडलाईन

मुंबई : नक्षलमुक्त महाराष्ट्र केल्यानंतर आता ड्रग्जमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी फडणवीस सरकारने २०२९ची डेडलाईन आखली आहे. त्यानुसार, राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेशक नवीन धोरणाला मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत अधिकृत मंजुरी देण्यात आली. अशाप्रकारचे सर्वसमावेशक धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या धोरणांतर्गत राज्यातील अवैध अंमली पदार्थांची शेती, लागवड, सिंथेटिक व नैसर्गिक पदार्थांचे उत्पादन, वाहतूक, विक्री आणि सेवनावर संपूर्ण बंदी आणत कठोर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी ’अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स’ सोबत समन्वय साधत ग्रामपातळीपासून ते मंत्रालयीन स्तरापर्यंत विविध विभागांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. मंत्रालय स्तरावर समन्वयासाठी प्रत्येक विभागाकडून उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाईल. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध विभागांचे ’क्शन प्लॅन’ तयार करण्यात आले आहेत. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पाचवीच्या अभ्यासक्रमात अंमली पदार्थांविषयी किमान एक धडा समाविष्ट केला जाणार आहे. तसेच ’मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ आणि ’मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ यांसारख्या योजनांमध्ये अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी वाढीव गुण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. शैक्षणिक संस्थांचे परिसर ’ड्रग फ्री कॅम्पस’ राखण्याची जबाबदारी उच्च व तंत्रशिक्षण विभागावर असेल. याशिवाय, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांना दरवर्षी २६ जून रोजी ’अंमली पदार्थमुक्त उत्कृष्ट जिल्हा’ म्हणून गौरविण्यात येणार आहे.

## सोयाबीनच तेराव..



टायटॅनिक जहाज हिमनगाला धडकल्यावर जवळपास अडीच तासांनी बुडालं. एवढा वेळ असूनही काही लोकांचे जीव का वाचू शकले नाहीत? तर त्यापैकी एक कारण होतं, एवढं महाकाय जहाज बुडूच शकत नाही हा खोटा आत्मविश्वास.

असंच झालंय नेमकं हायब्रीड शहरी लोकांचं. शेतीत येणाऱ्या अडचणींच्या बाबतीत त्यांनाही तसंच वाटतं, की दुष्काळ येऊच शकत नाही आणि आला तरी त्याचा आमच्यावर काही परिणाम होणार नाही किंवा उशिरा होईल असं त्यांना वाटतं.

मग हे हायब्रीड शहरी कोण? जे तालुक्याच्या, जिल्ह्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी राहायला गेले; पण त्यांचा अजूनही शेतीशी संबंध आहेच. कुणाचा भाऊ, कुणाचे वडील किंवा ठोक्याने का होईना शेती आहेच, गाव आहेच. आता येऊयात मूळ मुद्द्यावर. दुष्काळ या वर्षी किंवा पुढच्या वर्षी ’अल निनो’मुळे जरी आला, तरी याचा परिणाम सगळ्यांवरच होणार. काल गावाकडे गेल्यावर अतिशय उदासीन वातावरण होतं. रस्त्यालगतच्या सोयाबीन, कपाशीच्या शेतात माना टाकलेल्या रोपांकडे बघण्याएवढं काळीज मजबूत होईना. दुष्काळ हळूहळू रंग दाखवणार; पण फरक एवढाच राहणार की गावाकडे राहणारा शेतकरी अशा संकटाला खंबीरपणे तोंड देऊ शकतो. कारण त्याच्याकडे गमावण्यासाठी काही नाही. तो पैसे नसतील तर आहे तसं भागवू शकतो. दिवाळी नव्या कपड्यांशिवाय करू शकतो, भाजी शेंगदाण्याच्या कुटाशिवाय खाऊ शकतो, घरातील तुटक्या लाईटच्या वायरला चिंधी बांधून दिवस ढकलू शकतो, त्याच्या लेकरांच्या उशीर होत जाणाऱ्या फिस चा तगादा लावणाऱ्या मास्तर समोर लाज वाटून पण लाज गिळून घेऊन देतो लवकरच म्हणून स्वाभिमानाची माती करतो.... तो काहीही करून वेळ मारून नेऊ शकतो.पण हायब्रीड शहरी लोकांचं काय? त्यांना कांदा महाग झाला की रडू येतं, साखर महाग झाली की तिखट लागतं, भाज्या महाग झाल्या की पोट दुखतं.... लॉकडाऊनच्या काळात पाहिलं.. भलेमोठे पॅकेज असणारे परेशान होते. नोकरी गेलेले, पगार थांबलेले, कपात झालेले सांगताना तोंडाला फेस आला होता. तेव्हाही शेतकरी धैर्याने लढत होता. सांगायचं एवढंच आहे... सोयाबीनच्या तेराव्याचं सुतक फक्त गावकडच्या, खेड्यातल्या शेतकऱ्यांसाठीच आहे असं नाही, ते शहरी भावकीला पण लागू होईल.




## *दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात*

दुसरे महायुद्ध हे १९३९ ते १९४५ दरम्यान झालेले जागतिक युद्ध होते. हे युद्ध मुख्यतः युरोप व आशिया मध्ये दोस्त-राष्ट्रे व अक्ष-राष्ट्रे यांच्या मध्ये झाले. जर्मनीने पोलंडवर केलेल्या हल्ल्याने हे युद्ध १ सप्टेंबर १९३९ रोजी अधिकृतपणे सुरू झाले. यानंतर फ्रान्स, युनायटेड किंगडम आणि इतर राष्ट्रांनी जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले. जपानने व इटलीने जर्मनीच्या बाजूने युद्धात पदार्पण केले. १९४१ च्या डिसेंबर मध्ये जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बर बंदरावर आक्रमण केल्यामुळे अमेरिकेला युद्धात उतरणे भाग पाडले. अमेरिकेने युद्धात सक्रिय भाग घेतला व तेथून युद्ध जगभर पसरले. दोस्त राष्ट्रा मध्ये चीन, रशिया, इंग्लंड, अमेरिका व इतर राष्ट्रांचा समावेश होता, तर अक्ष राष्ट्रांमध्ये जर्मनी, इटली व जपान हे देश होते. जवळ जवळ ७० देशांचे सैन्य यात सहभागी झाले होते. या युद्धात सहा कोटींच्यावर माणसे मेली. मानवी इतिहासातील ही सर्वांत मोठी जीवितहानी आहे. या युद्धामध्ये दोस्त राष्ट्रांचा विजय झाला.

*दोस्त-राष्ट्रे*

सोव्हियत संघ, अमेरिका, भारत, चीन, फ्रान्स, पोलंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, युगोस्लाव्हिया, नॉर्वे, बेल्जियम, चेकोस्लोव्हाकिया, फिलिपाईन्स, ब्राझील व इतर.

*अक्ष-राष्ट्रे*

जर्मनी, जपान, इटली, हंगेरी, रोमेनिया, बल्गेरिया, थायलंड, फिनलंड, इराक, सोव्हियेत संघ व इतर.

*युरोप*

१ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले. जर्मनीचा नेता डॉल्फ हिटलर व त्याच्या नाझी पक्षाने सोव्हिएत संघाशी त्यापूर्वी मैत्री-करार केला होता. त्यानुसार सोव्हिएत संघाने १७ सप्टेंबर च्या दिवशी पूर्वेकडून पोलंडवर चाल केली. याला प्रत्युत्तर म्हणून युनायटेड किंग्डम व फ्रान्सने सप्टेंबर ३ला जर्मनी विरुद्ध युद्ध जाहीर केले. सुरुवातीला हे युद्ध मुख्यत्वे सागरी युद्ध होते. काही महिन्यातच जर्मनीने पोलंड काबीज केले. त्यानंतर १९४० मध्ये जर्मन सैन्याने नॉर्वे, नेदरलँड्स, बेल्जियम व फ्रान्स पादाक्रांत केले व १९४१ मध्ये युगोस्लाव्हिया आणि ग्रीसचा पाडाव केला. इटलीने उत्तर आफ्रिकेतील ब्रिटिश वसाहतींवर हल्ला केला. काही महिन्यांनी त्यांना जर्मन सैन्याची कुमक मिळाली. १९४१ च्या मध्यापर्यंत जर्मनीने बहुतांश पश्चिम युरोप आपल्या टाचेखाली आणले होते परंतु युनायटेड किंग्डम जिंकणे त्यांना जमले नाही. याचे मुख्य कारण होते रॉयल एअर फोर्स व रॉयल नेव्हीने दिलेली कडवी झुंज. आता हिटलर सोव्हिएत संघावर उलटला व २२ जून १९४१ रोजी त्याने अचानक सोव्हिएत संघावर चाल केली. ऑपरेशन बार्बारोसा या सांकेतिक नावाने योजलेल्या या मोहिमेत जर्मनीला सुरुवातीला भरभरून यश मिळाले. १९४१ शेवटी जर्मन सैन्याने मॉस्को पर्यंत धडक मारली परंतु येथे ही मोहीम अडकून पडली. सोव्हिएत सैन्याने कडवा प्रतिकार करीत जर्मनीचा रेटा मोडून काढला. पुढे सोव्हिएत सैन्याने स्टालिनग्राडला वेढा घालून बसलेल्या जर्मनीच्या सहाव्या सैन्यालाच प्रतिवेढा घालुन पूर्ण सैन्याला युद्धबंदी बनवले. कुर्स्कच्या युद्धात सोव्हिएत सैन्याने जर्मनीचा प्रतिकार मोडून काढला व लेनिनग्राडचा वेढा उठवला. जर्मन सैन्याने अखेर माघार घेतली. लाल सैन्याने त्यांचा बर्लिन पर्यंत पाठलाग केला. बर्लिन मध्ये जर्मन सैन्याने व सामान्य नागरिकांनी घराघरातून सोव्हिएत सैन्याला झुंज दिली परंतु प्रचंड प्रमाणात मिळत असलेल्या कुमकेच्या जोरावर सोव्हिएत सैन्याने बर्लिन जिंकले. याच सुमारास (३० एप्रिल १९४५) हिटलरने आपल्या भूमिगत बंकर मध्ये आत्महत्त्या केली. इकडे पाश्चिमात्य दोस्त राष्ट्रांनी १९४३ मध्ये इटलीवर चाल केली. १९४४ मध्ये त्यांनी नॉर्मंडीच्या किनाऱ्यावर हल्ला केला व फ्रान्सला जर्मन आधिपत्यातून मुक्त केले. जर्मनीने चढवलेल्या प्रतिहल्ल्याला ऱ्हाईन नदीच्या किनाऱ्यावर बॅटल ऑफ द बल्ज नावाने प्रसिद्ध लढाईत दोस्त राष्ट्रांनी जबरदस्त उत्तर दिले व येथून आगेकूच करित त्यांनी जर्मनी गाठले आणि एल्ब नदीच्या किनाऱ्यावर पूर्वेकडून चालून आलेल्या सोव्हिएत सैन्याशी संधान बांधले. यावेळी जर्मनीच्या उरल्यासुरल्या सैन्याने शरणागती पत्करली व हार मान्य केली. युरोप मध्ये चाललेल्या या धुमश्चक्री दरम्यान जर्मन राष्ट्राकडून चालविण्यात आलेल्या वंश हत्येत ६०,००,००० ज्यू व्यक्तींचा बळी गेला. याला ज्यूंचे शिरकाण अथवा होलोकॉस्ट म्हणण्यात येते.

*आशिया व प्रशांत महासागर*

युरोप मध्ये युद्धाला तोंड फुटण्यापूर्वी जपानने ७ जुलै १९३७ रोजी चीनवर आक्रमण केले. जपानचा रोख चीन मधून पूर्व आणि आग्नेय आशियावर स्वारी करीत एक एक देश जिंकायचा होता. यात मिळालेल्या यशानंतर जपानने ७ डिसेंबर १९४१ च्या दिवशी अनेक राष्ट्रांवर एकाच वेळी हल्ला केला. याच दिवशी पर्ल हार्बर येथे अमेरिकेच्या नौदलावरही हल्ला चढवला गेला. याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने युद्धात उतरण्याचे निश्चित केले. पुढील सहा महिने जपानला घवघवीत यश मिळाले पण कॉरल समुद्राच्या लढाईत अमेरिकन नौसैन्याने त्यांचा प्रतिकार केला व मिडवेच्या लढाईत जपानने हार पत्करली. यात जपानच्या चार विमानवाहू नौका बुडवून अमेरिकेने जपानी नौसैन्याचा कणाच मोडला. येथून दोस्त राष्ट्रांनी जपानवर प्रतिहल्ला चढवला व मिल्ने बे व ग्वादाल कॅनालच्या लढाईत त्यांनी विजय मिळवला. नैर्ऋत्य प्रशांत महासागरा मध्ये विजयी ठरलेल्या दोस्त राष्ट्रांनी मग प्रशांत महासागराच्या मध्य भागावर रोख धरून मोहीम काढली. यात जपानी सैन्याने त्यांचा कडवा प्रतिकार केला. या मोहीमे दरम्यान फिलिपाईन समुद्राची लढाई, लेयटे गल्फची लढाई, इवो जिमा व ओकिनावाची लढाई, इ. अनेक भयानक सागरी युद्धे लढली गेली. या दरम्यान अमेरिकन पाणबुड्यांनी जपानकडे जाणारी रसद तोडण्यात यश मिळवले. याने जपानची आर्थिकदृष्ट्या कुचंबणा होऊ लागली. १९४५ मध्ये दोस्त राष्ट्रांच्या वायुदलाने जपानवर अनेक वादळी हल्ले चढवले. मुख्यत्वे नागरी वस्त्या व कारखान्यांवर झालेल्या या हल्ल्यांनी जपानची युद्धप्रवण राहण्याची शक्ती कमी झाली. अखेर ६ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा शहरावर परमाणु बॉम्ब टाकला. ९ ऑगस्ट ला अमेरिकेने नागासाकी शहरावर असाच हल्ला केला व जोपर्यंत जपान शरण येत नाही तोपर्यंत एक एक करित जपानी शहरे बेचिराख करण्याची धमकी दिली. जपानने १५ ऑगस्ट १९४५ रोजी बिनशर्त शरणागती पत्करली व दुसऱ्या महायुद्धाचा अधिकृतरीत्या अंत झाला.

*पर्यवसान*

या अतिभयानक युद्धात अंदाजे ६,२०,००,००० (सहा कोटी वीस लाख) व्यक्ती मरण पावल्या. हे म्हणजे जगाच्या त्यावेळेच्या लोकसंख्येच्या २.५% होय. अर्थात, हा केवळ अंदाज आहे व प्रत्येक राष्ट्राचे अंदाज वेगवेगळे आहेत. युरोप मधील आणि आशिया मधील अनेक देश या युद्धात बेचिराख झाले. त्यातून सावरायला त्यांना पुढील अनेक दशके घालवावी लागली. दुसऱ्या महायुद्धाचे राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच तंत्रज्ञानाच्या दृष्टीने जगावर झालेले प्रभाव आज देखील दिसून येतात.

*संदर्भ : विकिपीडिया*

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची राहील. संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२

# परतूरमध्ये तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद ; जिल्हा परिषद व खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी गाजवला वक्तृत्वाचा मंच

✲परतूर,✲ दि. ३१ ऑगस्ट २०२६ शिक्षण विभाग, पंचायत समिती परतूर यांच्या वतीने पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, परतूर येथे सरकारी जिल्हा परिषद शाळा व खासगी शाळांसाठी स्वतंत्र तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धे चे सोमवारी (दि. ३१) उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी श्री. रवी कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधून विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, उच्चार, आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य आणि विषय मांडणी या गुणांचा कस या स्पर्धेत लागला. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने इंग्रजी भाषेत आपले विचार मांडत उपस्थितांची मने जिंकली.

**✲सरकारी जिल्हा परिषद शाळांचा निकाल✲**

**इयत्ता ५ वी व ६ वी - अ गटात**

प्रथम क्रमांक भक्ती गोविंद शिंदे, द्वितीय आदिती राजेभाऊ ढवळे, तर तृतीय क्रमांक स्वरा दिनकर खरात यांनी पटकावला.

**इयत्ता ७ वी व ८ वी - ब गटात**

प्रथम अक्षरा पंढरीनाथ भुंबर, द्वितीय सान्वी राजू दाभाडे, तर तृतीय भाविका अमोल खरात यांनी मिळविला.

**इयत्ता ९ वी व १० वी - क गटात**

प्रथम क्रमांक समृद्धी दिगंबर देवकर, तर द्वितीय क्रमांक श्रावणी चक्रधर आकात यांनी पटकावला.

**✲खासगी शाळांच्या गटातील विजेते✲**

**इयत्ता ५ वी व ६ वी - अ गटात**

प्रथम दक्ष ललित मेहता, द्वितीय रुद्र गोविंद वैद्य, तर तृतीय वेदांत शंकर गंगधरे यांनी यश मिळविले.

**इयत्ता ७ वी व ८ वी - ब गटात**



प्रथम अलिजा जावेदखान पठाण, द्वितीय तन्वी कैलास पवार, तर तृतीय समर्थ बालकृष्ण अंकुशकर यांनी क्रमांक मिळविला.

**इयत्ता ९ वी व १० वी - क गटात**

प्रथम अभितोष मुकुंदराज जोशी, द्वितीय नम्रता जगन सोळंके, तर तृतीय ईश्वरी अशोक सोळंके यांनी बाजी मारली.

**✲तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन✲**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व विषयतज्ज्ञांची पूर्णवेळ उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा, प्रभावी संवादकौशल्य व वक्तृत्वाच्या अनुषंगाने मोलाचे मार्गदर्शन करून महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. इंग्रजी विषयाची विशेष आवड असणारे शिक्षक, प्राध्यापक तसेच डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. सरकारी जिल्हा परिषद शाळांच्या गटासाठी श्री. महेशकुमार लाहोटी व श्री. संजय सोनकांबळे, तर खासगी शाळांच्या गटासाठी श्री. देविदास आठवे व श्रीमती मंजुषा जवादे मॅडम यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे सूक्ष्म निरीक्षण करून पारदर्शक गुणदान प्रक्रियेद्वारे निकाल निश्चित करण्यात आला.

**✲उत्कृष्ट नियोजनामुळे स्पर्धेला मिळाले यश✲**

या संपूर्ण स्पर्धेचे मुख्य आयोजन व उत्कृष्ट नियोजन इंग्रजी भाषा तज्ज्ञ श्री. योगेश औटी, डॉ. स्मिता रोडगे तसेच बी.आर.सी.च्या सर्व स्टाफने केले. केंद्रस्तरीय व बिटस्तरीय स्पर्धांचे नियोजनही सर्व केंद्रप्रमुखांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, परतूर शाळा समिती अध्यक्ष श्री. द. या. काटे व मुख्याध्यापक श्री. संजय गोरे तसेच शाळेच्या सर्व स्टाफने स्थानिक पातळीवर सुंदर नियोजन करून स्पर्धेसाठी आलेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांची उत्तम व्यवस्था केली.

**✲सूत्रसंचालनाने रंगत, आभार प्रदर्शनाने सांगता✲**

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. जावेदखान पठाण यांनी करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या उत्कृष्ट सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. उपस्थित मान्यवर व शिक्षकांच्या शुभहस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. श्री. देव चित्राल यांनी बक्षीस वितरणाचे नियोजन करून उपस्थितांचे आभार मानले.

इंग्रजी भाषेची गोडी, आत्मविश्वासपूर्ण वक्तृत्व आणि विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी ही स्पर्धा परतूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरली.

# अहिल्यानगरमध्ये ४ लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळली, प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत अर्थात एसआयआर पडताळणीत जिल्ह्यातील तब्बल ४ लाख २६ हजार ९३० मतदार असंकलित आढळले आहेत. यामध्ये मयत, दुबार तसेच कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांचा समावेश आहे. या मतदारांची नावे वगळल्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्यातील ३३ लाख ८३ हजार १८७ मतदारांची प्रारूप मतदार यादी सोमवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. एसआयआर अंतर्गत जिल्ह्यातील एकूण ३८ लाख १० हजार मतदारांची पडताळणी करण्यात आली. त्यापैकी ४ लाख २६ हजार ९३० म्हणजेच ११.२२ टक्के मतदार असंकलित आढळून आले. त्यामुळे आता प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीतून या मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करण्याची संधी देण्यात आली आहे. ३१ ऑगस्टपासून ३० सप्टेंबरपर्यंत दावे–हरकती दाखल करता येणार आहेत. दाखल झालेल्या दावे–हरकतींचे निराकरण २९ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येणार असून, त्यानंतर ४ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

संकेतस्थळावर मतदार यादी तपासता येणार

मतदारांना निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर मतदार यादी तपासता येणार आहे. तसेच आपल्या भागातील बीएलओ अर्थात बूथ लेव्हल ऑफिसरकडूनही मतदार यादीची माहिती घेता येणार आहे. मतदार यादीतील आपले नाव, नावाचे स्पेलिंग, वय किंवा जन्मतारीख, छायाचित्र, पत्ता, मतदार क्रमांक तसेच मतदान केंद्राची माहिती योग्य आहे का, याची मतदारांनी तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार यादीत नाव आढळून न आल्यास किंवा काही माहिती चुकीची असल्यास संबंधितांना दावे–हरकती दाखल करता येणार आहेत. नवीन नाव नोंदणी करण्यासाठी किंवा वगळलेले नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी नमुना क्रमांक ६, आवश्यक



कागदपत्रे आणि घोषणापत्रासह अर्ज करावा लागणार आहे.

दरम्यान, सुनावणीच्या वेळी कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे. तसेच तालुकास्तरावर समन्वयासाठी तालुकास्तरीय अधिकारी किंवा त्यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. असंकलित मतदारांमध्ये मयत, दुबार आणि कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांचा समावेश आहे. या मतदारांशी संबंधित आवश्यक माहिती बीएलओंनी जतन करून ठेवावी, तसेच प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नमुना क्रमांक ६, ७ आणि ८ पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवावेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. प्रारूप मतदार यादीनुसार जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ३३ लाख ८३ हजार १८७ मतदार आहेत.

३० सप्टेंबरपूर्वी हरकती दाखल करण्याचे आवाहन

एसआयआर पडताळणीत जिल्ह्यातून वगळण्यात आलेल्या मतदारांमध्ये १ लाख ४१ हजार २१२ मयत मतदार, ५० हजार १६७ गैरहजर मतदार, १ लाख ७१ हजार ७१९ कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार आणि १ हजार १२५ इतर मतदारांचा समावेश आहे. याशिवाय यापूर्वी नोंदणी झालेले ६२ हजार ७०७ मतदार देखील या प्रक्रियेत वेगळे करण्यात आले आहेत. त्यामुळे आता प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्येक मतदाराने आपले नाव आणि मतदार यादीतील तपशील तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. नाव वगळले गेले असल्यास किंवा माहितीमध्ये काही त्रुटी असल्यास ३० सप्टेंबरपूर्वी दावे–हरकती दाखल करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला नाशिक परिमंडळात उत्स्फूर्त प्रतिसाद

: केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या नाशिक परिमंडळात ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत परिमंडळातील ७४ हजार ५५७ ग्राहकांनी छतावर सौर यंत्रणा बसवून पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी केले असून, ते स्वतःच वीज निर्माते बनले आहेत. या सौर यंत्रणांची एकूण क्षमता २६० मेगावॅट आहे. योजनेचा अधिकाधिक ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद



महिन्याला ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे, या उद्देशाने केंद्र सरकारने ही योजना सुरू केली आहे. महावितरणच्या अहिल्यानगर मंडळात ३० हजार ४७५ ग्राहकांनी (१०२.७७ मेगावॅट), मालेगाव मंडळात ६ हजार ३५२ ग्राहकांनी (२१.७४ मेगावॅट), तर नाशिक मंडळात ३७ हजार ७३० ग्राहकांनी (१३५.९६ मेगावॅट) सौर यंत्रणा बसविली आहे. या योजनेअंतर्गत एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये, तर तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. हाउसिंग सोसायट्यांनाही ५०० किलोवॅटपर्यंत प्रतिकिलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार महिन्याला अंदाजे १२० युनिट वीज निर्मिती होते.

बँकांकडून सवलतीच्या दरात कर्जही उपलब्ध

निर्माण झालेली वीज घरगुती वापरासाठी उपयोगी पडते. गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्यास वीजबिल शून्य होण्यास मदत होते. यामुळे ग्राहकांचा आर्थिक फायदा होण्याबरोबरच पर्यावरणाचेही संरक्षण होते. रूफटॉप सोलर प्रकल्प उभारणाऱ्या ग्राहकांना आवश्यक नेट मीटर मोफत बसविण्यात येत असून, १० किलोवॅटपर्यंतच्या क्षमतेसाठी त्वरित स्वयंचलित मंजुरी दिली जात आहे. तसेच या योजनेसाठी बँकांकडून सवलतीच्या दरात कर्जाची सुविधाही उपलब्ध आहे. योजनेची माहिती व नोंदणीसाठी https:// www. pmsuryaghar. gov.in/ या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध आहे. तसेच 'पीएम सूर्यघर' ('झच् डीूरसहरी') हे मोबाईल ॲपही उपलब्ध असून, नोंदणीनंतर ग्राहकांना आपल्या पसंतीचा विक्रेता निवडता येतो.

पान १ व ४ वरून

## जालना जलकवच

पंचायत समिती बदनापूर ),पंचायत समितीचे अधिकारी ,VB-G R-M-G योजनेचे सर्व संबंधित कर्मचारी, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, आशा व अंगणवाडी सेविका, ग्राम रोजगार सेवक तसेच मोठ्या संख्येने शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागातून जलसंधारणाची ही कामे गुणवत्तापूर्ण व नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करून 'जलयुक्त गाव – समृद्ध गाव' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

जालना जलकवच अभियान २०२६ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे बदनापूर तालुक्यात जलसंधारणाच्या कामांना नवी दिशा मिळणार असून, लोकसहभागातून जलसुरक्षित व समृद्ध गावांची निर्मिती करण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

## तळणीच्या ऐतिहासिक

उघडा पडला असून, दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना जीव मुठीत धरून उभे राहावे लागते. पावसाळ्यात आणि गर्दीच्या वेळी येथे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकप्रतिनिधींनी तात्काळ निधी देऊन या भिंतीचे बांधकाम करणे गरजेचे झाले आहे.

श्रावणात लाखोळी; तरुणांची मोठी श्रद्धा

तळणी आणि परिसरातील

पान १ व ४ वरून

पंचक्रोशीतील हजारो तरुणांची जमनागीर बाबांवर अथांग श्रद्धा आहे. संपूर्ण श्रावण महिन्यात दररोज हजारो शिवभक्त तरुण या ठिकाणी महादेवाला लाखोळी (लाख बेल वाहणे) वाहण्यासाठी गर्दी करतात. श्रावणी शनिवार आणि सोमवारी तर येथे पाय ठेवायलाही जागा नसते. अशा वेळी भाविकांना ऊन–पावसापासून संरक्षण मिळण्यासाठी मंदिरासमोरील खुल्या जागेत सभामंडप असणे अत्यंत आवश्यक आहे.

भंडाऱ्यांचे आयोजन

माता–भगिनींची गैरसोय

या पवित्र तीर्थक्षेत्रावर वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे, पारायणांचे आणि भंडाऱ्यांच्या माध्यमातून भव्य अन्नदानाचे नियोजन केले जाते. या धार्मिक कार्यात गावातील माता–भगिनी, वृद्ध आणि बालके मोठ्या संख्येने सहभागी होतात. मात्र, मंदिर परिसरातील जागा अपुरी पडत असल्याने महाप्रसाद वाटप करताना आणि बसताना मोठी अडचण निर्माण होते. सभामंडप झाल्यास या सर्व सोहळ्यांना शिस्तबद्ध स्वरूप येईल.

लोकप्रतिनिधींना साकडे; तातडीने निधी देण्याची मागणी

ग्रामस्थांनी स्वखर्चातून आणि लोकवर्गणी गोळा करून मंदिराचा कायापालट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. व मंदिर सुद्धा उभारणे पूर्ण झाली आहे मात्र, मोठ्या विकासकामांसाठी शासकीय निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे भागातील आमदार, खासदार आणि जबाबदार लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने पाहावे. तळणीकरांच्या श्रद्धेचा आदर करून येथे तात्काळ भव्य सभामंडप आणि संरक्षक भिंतीसाठी निधी मंजूर करावा, अशी मागणी गावातील तरुण मंडळी लाखोळी मंडळ व ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे.

## मोटारसायकल चोरी

पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना देण्यात आल्यानंतर पथकाने कुंभारपिंपळगाव परिसरात संशयिताचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडे मोटारसायकल चोरीबाबत विचारपूस केली असता सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र विश्वासात घेऊन सखोल चौकशी केल्यानंतर त्याने दोन मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. त्यानंतर आरोपीच्या ताब्यातून चोरीच्या दोन्ही मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. या मोटारसायकलींची एकूण किंमत ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्त मोटारसायकलींची अभिलेखावर तपासणी केली असता त्यापैकी एका मोटारसायकल चोरीप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३१/२०२५, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता, तर दुसऱ्या मोटारसायकल चोरीप्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात

पान १ व ४ वरून

गु.र.नं. २६८/२०२१, कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेने एकाच कारवाईत मोटारसायकल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कामगिरी ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार प्रभाकर वाघ, कैलास खाडे, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, इरशाद पटेल, सागर बाविस्कर, दत्ता वांघुडे, कैलास चेके, भागवत खरात, सोपान क्षीरसागर आणि अशोक जाधव यांच्या पथकाने केली.

## न्यू एमआयडीसीतील

प्रेस नोटमध्ये नमूद केले आहे.

या गुन्ह्यात कल्याण अशोक हिवाळे (वय २०, रा. गिरिराजपिंपळगाव) व कंपनीतील सुरक्षा रक्षक सिद्धोधन म्हस्के यांचाही सहभाग असल्याची माहिती पुढे आली. चोरीचा कॉपर अजमतखान समदखान पठाण (वय १९, रा. चिखली दाभाडी, ता. बदनापूर) याला विकल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यालाही पोलिसांनी अटक केली. अशाप्रकारे या प्रकरणात एकूण सहा आरोपींना अटक करण्यात आली.

**२५२ किलो कॉपरसह वाहने जप्त**

अटक आरोपींकडून चोरीतील २५२ किलो कॉपर बॉबीन, किंमत ३ लाख ७६ हजार ५०० रुपये, तसेच गुन्ह्यात वापरलेली शाईन मोटारसायकल, महिंद्रा मॅक्सिमो वाहन आणि छोटा हत्ती वाहन असा एकूण १० लाख ३६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

**सुरक्षा रक्षकानेच आखला चोरीचा कट**

तपासात सुरक्षा रक्षक सिद्धोधन म्हस्के याने मागील १५ दिवसांत कंपनीत तीन वेळा चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. कंपनीतील कॉपर चोरी करण्याचा कट रचून त्याने साथीदारांना स्वतःची मोटारसायकल उपलब्ध करून दिली होती. रात्रीच्या वेळी पोलिसांच्या वाहनांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी साथीदारांना पाठवले जात असल्याचेही तपासात समोर आले.

कॉपर कंपनीच्या भिंतीबाहेर फेकल्यानंतर भिंतीवरून उड्या मारून तो माल मॅक्सिमो वाहनात भरला जात असे. त्यानंतर निर्जन ठिकाणी चोरीचा माल छोटा हत्ती वाहनात हस्तांतरित करून अजमतखान याच्यामार्फत विक्री केला जात असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. अटक आरोपी सुनील पवार हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध यापूर्वी दरोड्याचा गुन्हा दाखल असल्याचेही पोलिसांनी नमूद केले

पान १ व ४ वरून

आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रवी देशमाने करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक रवी देशमाने, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, गंभीर पाटील, पोलीस कॉन्स्टेबल गणेश नाईकवाडे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सागर बावस्कर यांच्या पथकाने केली.

## उज्जैनमध्ये २२–२३ राज्यांतील

सरचिटणीस ड. सुरेश काळे प्रमुख उद्धवराव भोसले(आदिम महासंघाचे हिंगोली व मराठवाडा प्रभारी), देविदास शिंदे (आदिम महासंघ नांदेड जिल्हाध्यक्ष) तसेच कोमल ताई चव्हाण (आदिम महासंघाचे महाराष्ट्र युवा महिला प्रदेश अध्यक्ष)अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी विविध राज्यांतून आलेल्या पारधी समाजबांधवांनी आपल्या सामाजिक अडचणी, अन्याय–अत्याचाराच्या घटना, ओळखीचे प्रश्न तसेच शिक्षण, रोजगार आणि संघटनात्मक विकासाबाबतच्या अपेक्षा मांडल्या. प्रमुख पदाधिकाऱ्यांनी समाजाच्या एकजुटीची आवश्यकता अधोरेखित करत भविष्यात संघटितपणे सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी

पान १ व ४ वरून

प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत छायाचित्र काढण्यासाठी समाजबांधवांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. विविध राज्यांतून आलेल्या समाजबांधवांची ही उपस्थिती पारधी समाजातील वाढत्या संघटनात्मक जाणीवेचे प्रतीक ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली. दीडशे वर्षांच्या सामाजिक संघर्षानंतर देशभरातील पारधी समाज एका व्यासपीठावर एकत्र येणे ही ऐतिहासिक घटना असून, उज्जैनचे हे संमेलन पारधी समाजाच्या संघटनात्मक वाटचालीतील नवे पर्व ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## जय श्री महाकाल'

मार्गावर भक्तीचे चैतन्य पाहायला मिळत होते.

**महादेवाला वरुणराजासाठी साकडे**

लोणारवरून आणलेल्या पवित्र तीर्थाने तळणी येथील श्री जमनागीर महाराज संस्थान येथे पारंपरिक पद्धतीने आणि मंत्रोच्चारात जलाभिषेक करण्यात आला. यावर्षी सर्वत्र समाधानकारक आणि मोठ्या प्रमाणात पाऊस पडू दे, शेतकरी सुखी होऊ दे, अशी मनोकामना यावेळी सर्व कावडधारकांनी आणि ग्रामस्थांनी भगवान महादेवा चरणी प्रार्थना करून व्यक्त केली. जलाभिषेकानंतर महाआरती आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# न्यू एमआयडीसीतील कॉपर चोरीचा अवघ्या आठ तासांत छडा; सहा आरोपी जेरबंद

जालना / प्रतिनिधी : जालना येथील न्यू एमआयडीसी फेज-३ मधील एका ऑप्टिकल कंपनीतून सुमारे ४०० किलो वजनाचे कॉपर बॉबीन चोरीस गेल्याच्या प्रकरणाचा चंदनझिरा पोलिसांनी अवघ्या आठ तासांत छडा लावला. सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी सहा आरोपींना जेरबंद केले असून, चोरीतील कॉपरसह गुन्ह्यात वापरलेली वाहने असा एकूण १० लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे, कंपनीतील सुरक्षा रक्षकच या चोरीचा मुख्य सूत्रधार असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

न्यू एमआयडीसी फेज-३ येथे एसी उत्पादक म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऑप्टिकल कंपनीत ३१ ऑगस्टच्या रात्री चोरीची घटना घडली. कंपनीतील सुमारे ४०० किलो वजनाचे आणि अंदाजे ७ लाख ५० हजार रुपये किमतीचे कॉपर बॉबीन चोरीला गेल्याची तक्रार कंपनीच्या स्टोअर असिस्टंटने चंदनझिरा पोलीस ठाण्यात दिली. त्यावरून चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांना गुन्हा तातडीने उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत घटनास्थळाची पाहणी केली. कंपनीतील सुरक्षा व्यवस्था, परिसरातील हालचाली तसेच जालना एमआयडीसी परिसरातून महामार्गाकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करण्यात आली. त्यासोबत गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयितांची माहिती निष्पन्न करण्यात आली. तपासादरम्यान कंपनीतील सुरक्षा रक्षक सिद्धोधन लक्ष्मण म्हस्के (वय २३, रा. ब्रह्मवडगाव, ता. परतूर) याची चौकशी करण्यात आली. चौकशीत त्याचा चोरीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. त्यानंतर चोरीत सहभागी असलेल्या सुनील महादू पवार (वय २२), महेश बाबासाहेब दाभाडे (वय २०) आणि सोनू विठ्ठल जाधव (वय २१) यांच्याबाबत पोलिसांना माहिती मिळाली. हे संशयित दगडवाडी ते मानदेऊळगाव परिसरातील डोंगरावरील घनदाट झाडीत लपल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्या परिसरात धाड टाकली.




**घनदाट झाडीत पाठलाग करून आरोपींना पकडले**

पोलिसांची चाहूल लागताच संशयितांनी झाडीतून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत देशमुख आणि कृष्णा तंगे यांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान कंपनीतील कॉपर चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी (पान ३ वर)

## हॉटेल साईप्रसाद येथे संत सावता कावड मंडळाच्या यात्रेचे उत्साहात स्वागत

**श्रीरंग बापू दाभाडे यांच्या हस्ते कावडीचे पूजन; कावडधारकांना चहाचे वाटप**

बदनापूर / प्रतिनिधी : श्रावण मासानिमित्त श्री क्षेत्र घृष्णेश्वर येथून पवित्र जल घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या संत सावता कावड मंडळ, डोणगाव यांच्या कावड यात्रेचे बदनापूर येथील हॉटेल साईप्रसाद येथे भक्तिमय वातावरणात उत्साहात स्वागत करण्यात आले. कावड यात्रा हॉटेल साईप्रसाद येथे पोहोचल्यानंतर हॉटेलचे मालक श्रीरंग बापू दाभाडे यांनी कावडीचे विधिवत पूजन करून कावडधारकांचे स्वागत केले. यावेळी



यात्रेत सहभागी भाविक व कावडधारकांना हॉटेल साईप्रसादच्या वतीने चहाचे वाटप करण्यात आले. श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या आराधनेला विशेष महत्त्व असून, श्री क्षेत्र घृष्णेश्वर येथून पवित्र जल घेऊन निघालेल्या या कावड यात्रेमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कावडधारकांनी भगवान महादेवाचा जयघोष करत आपला पुढील प्रवास सुरू केला. कावडधारकांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल श्रीरंग बापू दाभाडे यांनी समाधान व्यक्त केले. कावड यात्रेच्या स्वागतामुळे हॉटेल साईप्रसाद परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## उज्जैनमध्ये २२-२३ राज्यांतील पारधी समाजाची ऐतिहासिक एकजूट आदिम महासंघाच्या राष्ट्रीय संमेलनात समाजाच्या व्यथा, इतिहास व हक्कांवर मंथन

उज्जैन, प्रतिनिधी : विमुक्त जाती दिनानिमित्त ३० व ३१ ऑगस्ट रोजी मध्य प्रदेशातील उज्जैन येथे आयोजित राष्ट्रीय पारधी जनजातीय संमेलनात देशातील २२ ते २३ राज्यांतील पारधी समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. दीर्घकाळ विविध राज्यांमध्ये विखुरलेल्या पारधी समाजाला एका व्यासपीठावर आणण्याच्या दृष्टीने हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरले. ब्रिटिश काळात १८७१ मध्ये लागू करण्यात आलेल्या क्रिमिनल ट्राइब्स कायद्यामुळे पारधी समाजासह अनेक विमुक्त व भटक्या समाजांवर 'जन्मजात गुन्हेगार' असा कलंक लावण्यात आला. त्यानंतरच्या काळातही या समाजाला संशयाच्या नजरेने पाहिले गेल्याने सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाला मोठा फटका बसल्याची भावना संमेलनात व्यक्त करण्यात आली. ३१ ऑगस्ट १९५२ हा विमुक्त जातींच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस मानला जातो. सोलापूर येथील सेटलमेंटमध्ये तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तेथील परिस्थिती पाहिल्यानंतर या समाजांच्या अवस्थेबाबत माहिती घेतली. त्यानंतर क्रिमिनल ट्राइब्स म्हणून घोषित करण्यात आलेल्या जातींना कायदेशीररीत्या मुक्त करण्यात आले. मात्र, कायदा रद्द झाल्यानंतरही सामाजिक



कलंक आणि संशयाची मानसिकता पूर्णपणे दूर झाली नसल्याचा मुद्दा संमेलनात मांडण्यात आला. गुन्ह्यांच्या घटनांमध्ये पारधी समाजाकडे संशयाने पाहिले जाणे, पोलिसांकडून होणारा कथित त्रास आणि सामाजिक उपेक्षा यामुळे अनेक कुटुंबांनी आपली मूळ ओळख लपविण्याचा प्रयत्न केला. परिणामी पारधी समाज विविध राज्यांमध्ये आणि विविध नावांनी विखुरला गेला. या पार्श्वभूमीवर उज्जैन येथे झालेल्या संमेलनात 'आपली मूळ पारधी ओळख आणि सामाजिक एकजूट' यावर विशेष भर देण्यात आला. संमेलनाच्या व्यासपीठावर आदिम महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. रूपसिंग भारबडिया, राष्ट्रीय सचिव श्री. बबनजी गोरामन, महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य तथा महाराष्ट्र प्रभारी श्री. सुदर्शनजी शिंदे आणि महाराष्ट्र राज्य संघटन (पान ३ वर)

## जिल्ह्यात साखरेच्या घाऊक उपभोक्तासाठी साखर साठवून ठेवण्यावर मर्यादा

जालना : केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय, अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी डींसरी (Stockholding Limit of Bulk Consumers) जीवशी, २०२६ निर्गमित केला आहे. हा आदेश १ सप्टेंबर २०२६ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत लागू राहणार आहे. या आदेशानुसार दरमहा १० मे.टन किंवा त्यापेक्षा अधिक साखर वापरणाऱ्या घाऊक उपभोक्ता (Bulk Consumer) कडे १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साखरेचा



साठा ठेवता येणार नाही. घाऊक उपभोक्ता (Bulk Consumer) मध्ये कन्फेक्शनरी उत्पादक, शीतपेय उत्पादक, अन्न प्रक्रिया उद्योग, मिठाई विक्रेते तसेच मागील एका वर्षातील चालू महिन्याव्यतिरिक्त कालावधीचा विचार करता दरमहा किमान १० मे. टन साखर वापरणारे अन्य संस्थात्मक खरेदीदार यांचा समावेश आहे. साखर कारखान्यांकडून घाऊक उपभोक्ता (Bulk Consumer) ला थेट अथवा दलालामार्फत करण्यात येणाऱ्या साखर विक्रीची मासिक मात्रा संबंधित विक्रेता/खरेदीदाराने दाखल केलेल्या ऋह्ढ ठर्शींीपी च्या आधारे पडताळण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व साखर व्यापारी, घाऊक विक्रेते, घाऊक उपभोक्ता (Bulk Consumer) तसेच संबंधित साखर कारखान्यांना केंद्र शासनाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना आहे. सर्व संबंधितांनी केंद्र शासनाच्या आदेशातील साखर साठा मर्यादेचे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे.

## जय श्री महाकाल'च्या जयघोषात तळणीत भव्य कावड यात्रा; जमनागीर बाबांना जलाभिषेक लोणारच्या पवित्र धारेवरून आणले तीर्थ; बळीराजासाठी साकडे

तळणी (प्रतिनिधी) : मंठा तालुक्यातील तळणी येथे श्री जमनागीर बाबा संस्थानच्या वतीने आयोजित भव्य कावड यात्रा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडली. 'जय श्री महाकाल मित्र मंडळा'च्या वतीने आयोजित या कावड यात्रेचे हे सलग चौथे वर्ष होते. श्रावण महिन्याचे औचित्य साधून गावातील शेकडो तरुणांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता.

या कावड यात्रेमुळे संपूर्ण तळणी परिसर शिवमय झाला होता. जमनागीर बाबांच्या जयघोषाने आणि महादेवाच्या भक्तीने अवघे गाव न्हाऊन



निघाले होते.

**१३ किमीची पायी वारी आणि स्वागत**

यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तळणी येथील सुमारे २५० ते ३०० तरुणांनी या कावड यात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिवभक्तांनी श्रीक्षेत्र तळणी ते श्रीक्षेत्र लोणार हे १३ किलोमीटरचे अंतर पायी पार केले. लोणार येथील प्रसिद्ध व पवित्र धारेश्वर धारेचे तीर्थ कावडीमध्ये भरून तरुणांनी तळणीकडे कूच केले. तळणी ते लोणार या दरम्यानच्या मार्गावर ठीकठिकाणी ग्रामस्थांनी आणि शिवभक्तांनी कावड धारकांचे जंगी आणि भावपूर्ण स्वागत केले.

**अन्नदात्यांकडून फराळाचे आयोजन**

कावड यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी अन्नदात्यांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी चोख व्यवस्था ठेवली होती. पायी चालणाऱ्या शिवभक्तांसाठी अनेक ठिकाणी फराळ, फळे आणि पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय करण्यात आली होती. मार्गावरील गावांमध्ये कावडीचे दर्शन घेण्यासाठी अबालवृद्धांनी गर्दी केली होती. संपूर्ण १३ किलोमीटरच्या (पान ३ वर)

## भायगव्हाण येथे 'राज्य रेशीम दिना'निमित्त शास्त्रज्ञ-शेतकरी संवाद कार्यशाळा संपन्न हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर रेशीम शेती शाश्वत उत्पन्नाचा प्रभावी पर्याय : शास्त्रज्ञ अंकुश गाडगे

जालना : महाराष्ट्र 'राज्य रेशीम दिना'चे औचित्य साधून घनसावंगी तालुक्यातील मौजे भायगव्हाण येथे १ सप्टेंबर २०२६ रोजी 'रेशीम उद्योगाच्या उन्नतीसाठी रेशीम तंत्रज्ञानाची जनजागृती' या विषयावर एकदिवसीय शास्त्रज्ञ-शेतकरी संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय रेशीम मंडळ, संशोधन विस्तार केंद्र (औरंगाबाद) आणि रेशीम संचालनालय, जिल्हा रेशीम कार्यालय (जालना) यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ-बी श्री. अंकुश सुभाष गाडगे यांनी शेतकऱ्यांशी सविस्तर संवाद साधला. ते म्हणाले की, सध्याच्या बदलत्या हवामानात आणि अनिश्चित पावसाच्या काळात पारंपारिक पिकांना पूरक म्हणून रेशीम शेती हा एक उत्तम आणि शाश्वत उपजीविकेचा पर्याय ठरत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी तुती लागवडीसाठी योग्य जमिनीची निवड, सुधारित तुती जाती, बागेचे खत व पाणी व्यवस्थापन, कीड व रोगांचे एकात्मिक नियंत्रण, रेशीम कीटक संगोपनगृहाचे निर्जंतुकीकरण, दर्जेदार चॉकी अळ्यांचा वापर, तापमान व आर्द्रता व्यवस्थापन, प्रौढ अळी संगोपन, योग्य माउंटेजचा वापर, दर्जेदार कोष उत्पादन आणि कोष विक्री व्यवस्थापन आदी विविध तंत्रज्ञानांची सविस्तर माहिती दिली. यशस्वी रेशीम पीक घेण्यासाठी या सर्व तंत्रज्ञानाचा एकात्मिक पद्धतीने अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ग्रामीण भागातील युवकांनी केवळ पारंपरिक शेती किंवा नोकरीवर अवलंबून न राहता रेशीम शेतीकडे मुख्य उत्पन्नाचा स्रोत आणि कृषी-आधारित व्यवसाय म्हणून पाहावे, असे आवाहनही श्री. गाडगे







यांनी केले. रेशीम शेतीमध्ये तुती लागवड, चॉकी संगोपन, रेशीम कीटक संगोपन, कोष उत्पादन, धागानिर्मिती आणि मूल्यवर्धित वस्तूंच्या निर्मितीपर्यंत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. युवक आणि महिलांच्या सहभागातून गावपातळीवर रेशीम उद्योगाची मजबूत मूल्यसाखळी विकसित होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी जिल्हा रेशीम कार्यालय, जालना येथील क्षेत्रीय सहाय्यक श्री. शरद जगताप यांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. त्यांनी 'सिल्क समग्र-२', 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना' (पोकरा) आणि 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा/व्हीबीजीआरएएमजी) योजनेअंतर्गत तुती लागवड, सिंचन सुविधा, रेशीम कीटक संगोपनगृह, संगोपन साहित्य आणि इतर आवश्यक घटकांसाठी उपलब्ध आर्थिक सहाय्याबाबत मार्गदर्शन केले. पात्र शेतकऱ्यांनी संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी भायगव्हाणचे सरपंच श्री. सुनील कोरडे यांनी उपस्थित अधिकारी व शास्त्रज्ञांचे बहुमोल तांत्रिक मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. रेशीम शेतीच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांचे आर्थिक भविष्य अधिक सक्षम करण्यासाठी ग्रामपंचायत, शेतकरी आणि रेशीम विभाग परस्पर समन्वयाने कार्य करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच गावामध्ये रेशीम शेतीचा प्रसार करून तुती लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांनी रेशीम शेतीतील तांत्रिक अडचणी, आर्थिक सहाय्य, कीड व रोग व्यवस्थापन आणि कोष विक्री याबाबत प्रश्न विचारले. शास्त्रज्ञ व विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. या शास्त्रज्ञ-शेतकरी संवादामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये रेशीम शेतीविषयी जागरूकता निर्माण झाली असून, गावातील युवक आणि शेतकऱ्यांनी रेशीम उद्योग स्वीकारण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद व्यक्त केला. या कार्यशाळेस गावातील प्रगतिशील शेतकरी, युवक, ग्रामस्थ तसेच रेशीम विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.